क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/308/०१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- १.०६.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती -------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ---------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ---------------------- जिल्हाः यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------**

****

दिनांक १५.०५.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-**वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ----------------------------------------------------
-------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका --------------------
जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ----------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------- (सर्व)

****

**दिनांक १५.०५.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.**

दिनांक १५.०५.२०१४ रोजी स्थायी समितीचे सभापती मा.श्री.प्रविण विनायकराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १.०० वाजता तहकुब झालेली सभा त्याच दिवशी दुपारी १.३५ वाजता घेण्यात आली. सभेला जि.प.चे खालील सन्मा.पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| **मा. सर्व श्री./श्रीमती** | | | |
| श्री.प्रविण विनायकराव देशमुख | सभापती, स्थायी समिती | - | - |
| - | - | - | - |
| श्री.प्रभाकर राघोजी उईके | सभापती स.क.स. | - | - |
| - | - | श्री. देवानंद न. पवार | सदस्य |
| श्री.अनिल भगवानराव नरवाडे | सदस्य | - | - |
| - | - | - | - |
| श्री. दिवाकर धनु राठोड | सदस्य | - | - |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| डॉ. शरद कुलकर्णी | अति.मु.का.अ. | डॉ. प्रशांत रुमाले | उप मु.का.अ.(पं.) तथा प्रभारी उप मु.का.अ. (सा.) |
| - | - | सौ. ज्योती भोंडे व.ले. (प्रतिनिधी) | मु.ले.वि.अ. |
| श्री. एस.एस.तपासे, | का.अ.बांधकाम क्र.१ | श्री. दिनेश प्र. गायकडवाड | प्र. का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. अमित मो. आडे | उप. का.अ. (पा.पु) | श्री. विजय साळवे | समाज कल्याण अधिकारी |
| श्री. प्रविण बा. पाठक | सहा.अभि.म.वि.वि.कं.यवत | श्री.अ.ना.मिसाळ, | उप. कार्य.अभि.(सिंचन) |
| श्री.जे.आर.राठोड, | कृ.वि.अ. | डॉ.के.झेड. राठोड | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधिकारी | श्री.व्ही.जे.वालदे | व. भू.वै.भू.स.वि.यं.यवतमाळ |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.अ.यवतमाळ | श्री. एफ. वाय. चांदेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. |
| श्री. वि.ह.गावंडे (प्रतिनिधी) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री. टि.व्हि. किरोळीकर | सहा.अधि.अभि.म.वि.वि.कं. |
| श्री.समीर एम. कवडे | प्र.का.अ.स.शि.अ.यवत | श्री.मनोज निरंजने | उप.संचा.सामाजिक वनिकरण |
| श्री.चंद्रकांत कारीया | उप.का.प्रं.ग्रा.स.यो. | श्री.भा.ब.पोटे, (प्रतिनिधी) | जि.अ.कृ.अधि.यवतमाळ |
| श्री.लि.रा. वाघमारे | उप.का.अ.बांध.उपवि क्र.१ | श्री. एम.एम.गवई | सहा.ले.अधि.(स.क.वि) |
| श्री.आर.के.पवार | क.अभि. यांत्रिकी | श्री.दिपक पिंपळकर | व.स.लेखा |
| श्री. एम.व्ही.भैसारे | व.स.बांध-१ | श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा. मा.अध्यक्ष,जि.प. |
| श्री.भानुदास चरडे | स्विय सहा.उप.मु.का.अ.(सा.) | श्री.एम.एम.आत्राम | स्वि.स.मा.स.क. सभापती |
| श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. | श्री.जि.एस.भारसंकर | स.अभि.बांध-२ |
| श्री.आर.आर.बेंडे | ग्रा.वि.अ.(पंचायत) | श्री.श्रीकांत मडावी | कनि.सहा.सा.प्र.वि. |
| श्री. पि.एस.गोबरे | कनि.सहा.,सा.प्र.वि. | श्री.डी.एम.ठाकरे | आ.सहा.आरोग्य विभाग |

सर्वप्रथम सचिवांनी मा.पदाधिकारी व सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगीने सभेच्या विषयास सुरवात करण्यापुर्वी गणपुर्ती अभावी सभा तहकुब करण्यात येत असल्याचे सांगीतले. व त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर **मा. अध्यक्ष** यांनी तहकुब केलेली सभा घेण्याचे सभेत जाहीर केले. तसेच तहकुब सभेची नोंद कार्यवृत्तात घेण्यात यावी असे सांगीतले. त्यानंतर दुपारी १.३५ वाजता सचिवांनी उपस्थित मा.पदाधिकारी व सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगीने सभेचे कामकाज सुरु केले.

**विषय क्र. १ :- दिनांक २१.४.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत काटेबाई शाळेतील मुख्याध्यापीकेने शाळेतील गोदरेज कपाट घरी नेल्या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ.) यांनी सदर प्रकरणाची चौकशी केल्यानंतर कपाट चोरीला गेले नसल्याचे सांगीतले.

मागील सभेत जि.प.प्रशासकीय इमारत परिसरात असलेल्या अनाधिकृत कॅन्टीन बाबत उपस्थित केलेल्या मुद्यावर **सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी कोणती कार्यवाही करण्यात आली याची विचारणा केली असता का.अ.बांध. क्र.१ यांनी रुपये १५,०००/-चा भरणा करून घेतलेला नाही असे सांगीतले. तसेच प्रस्तुत प्रकरण सन २००९ पासून कोर्टात असुन ते न्यायप्रविष्ठ आहे असे सांगुन त्यांनी वकिलांनी दिलेल्या निर्देशाचे वाचन सभागृहात केले व श्री. कापरेकर वकील यांनी दावा दाखल केला आहे व उक्त प्रकरणी वाटाघाटी करण्यात आली नाही असे सांगीतले. त्यावर **मा.अति.मु.का.अ.**यांनी सदरचे अतिक्रमण काढण्यात यावे असे मत प्रदर्शित केले. तसेच **सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी या प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन अतिक्रमण काढून टाकावे असे मत व्यक्त केले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प.** यांनी उक्त प्रकरणी अभ्यास करून संबंधीत वकीलांना बोलावून त्यांचेशी चर्चा करून का.अ.बांध-१ यांचे उपस्थितीत अंतिम निर्णय घेण्याबाबतचे **निर्देश अति. मु.का.अ. यांना दिले.**

**मा.सभापती (स.क.स.)** यांनी मागिल सभेत सा.बां. विभागाकडून जि.प.च्या रोडवर काम करतेवळी जि.प. कडुन एन.ओ.सी. घेतली जात नसल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ. बांध-१ व क्र.२ यांनी याबाबत शासनाला पत्र दिलेले आहे. तसेच दिनांक २६/८/२०१३ अन्वये अधिक्षक अभियता (सा.बां.) यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांच्याकडून कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नसल्यामुळे पुनश्च डिव्हिजनला पत्र पाठविण्यात आले असुन सदर बाब अधिक्षक अभियंता यांचे निदर्शनास आणुन दिलेली आहे असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने एखाद्या ठिकाणी जि.प.ची परवानगी मागितली नाही व त्या ठिकाणी काम सुरू केले तर त्या कामास जि.प.सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते किंवा कसे? याची विचारणा करुन बिना परवाना काम सुरू केले असेल तर सदर काम आपणास थांबविता येते काय ? याबाबतची विचारणा केली. त्यावर **मा. अध्यक्ष** यांनी अमरावती जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव घेण्यात आला असुन त्यांनी अश्याप्रकारे कामे करण्यास बंधन घातलेले आहे. तसेच त्याठिकाणी कामे थांबविलेले आहे, तर यवतमाळ जिल्हा परिषदेला या प्रकरणी वेगळ्याने नियम आहेत काय ? अशी विचारणा करुन सा.बां.विभागाने एन.ओ.सी. घ्यावयास पाहिजे होती असे सांगीतले असता का.अ.बांध-१ यांनी याबाबत शासन निर्णयाप्रमाणे आपण सर्वप्रथम सदर्हु बाब शासनाचे निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे असे सांगीतले. यावर **मा. अध्यक्ष** यांनी जिल्हा नियोजन समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला मान्यता दिली, निधी दिला, परंतु जर त्यांना जि.प.च्या रस्त्यावर काम करावयाचे असेल तर त्यांना एन.ओ.सी. घेणे आवश्यक आहे, कारण आपल्याला मंजूर झालेल्या कामापैकी किती लाखाची कामे रद्द झालीत याची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच आपल्या विभागाकडील टेंडरला लागलेल्या कामापैकी बी.ॲन्ड सी. ने किती कामे केलीत. याची माहिती लक्षात आहे काय अशी का.अ.बांध-१ व २ यांना विचारणा करुन जर आपणांस याची माहिती नसेल तर मी आपले निदर्शनास आणून देतो असे सांगीतले. त्याचप्रमाणे एकाच कामावर दोन योजनेचे काम करू नये किंवा मंजुर होऊ नये यासाठी आपणास काय कार्यवाही करता येईल याची विचारणा केली असता **का.अ.बांध-१** यांनी उक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाला कळवावे लागेल असे सांगीतले. तसेच **मा.अति.मु.का.अ.** यांनी बी.ॲन्ड सी ने जिल्हा परिषदेची परवानगी घेणे आवश्यक आहे परंतु जर तशी परवानगी घेतली नसेल तर शासनाला कामांच्या यादीनिशी कळवावे लागेल असे मत व्यक्त केले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प.** यांनी बांधकामाबाबतचे नियम, कायदे, या संदर्भात कायदेशीर सल्ला घ्यावा व पुढील होणा-या जि.प.च्या सर्वसाधारण सभेसमोर घेऊन या संदर्भात काय केले पाहिजे व काय करु नये याबाबत सुचवावे तसेच अधिक्षक अभियंता यांना वारंवार कळविले व वारंवार चर्चा करण्यात आली परंतु त्यांचेकडुन माहिती कागदपत्रावर येत नाही, त्यामुळे पुढील मिटींगमध्ये विशेष बाब म्हणून अधिक्षक अभियंता, सां.बा.विभाग, यवतमाळ यांना बोलवावे व सविस्तर माहिती घेऊन आपण पुढील स्थायी समितीच्या सभेला उपस्थित राहावे, याबाबतचे पत्र मा. मु.का.अ. किंवा सचिवांचे स्वाक्षरीने पाठविण्याचे **निर्देश का.अ.बांध-१ यांना दिले.**

**सन्मा.सदस्य सौ.उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे शिंदोला, ता. वणी शाळेचे निर्लेखनाचे प्रस्तावाबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **शि.अ. (प्राथ.)** यांनी निर्लेखनाबाबत पत्र देण्यात आले आहे. तसेच यादी प्राप्त झाली असुन ३७ शाळांचे प्रस्ताव निर्लेखन करण्यासाठी समिती समोर सादर करण्यात आले आहे. शिक्षण समिती कडुन मंजुर झाल्यावर पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागील सभेत मौजे धारमोहा, ता. महागांव येथील शाळा निर्लेखनाचे प्रस्तावाबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ.) यांनी सदर्हु प्रस्ताव सबंधित अभियंताकडे दिलेला असल्याचे सांगीतले.

**मा.उपाध्यक्ष श्री. ययाती म. नाईक** यांनी मागील सभेत पुसद तालुक्यातील प्रसुतीगृहाचे बांधकाम अर्धवट असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर जि. आ. अ. यांनी सदर कामाकरिता यावर्षी निधी प्राप्त झाला असल्यामुळे या वर्षी सदर्हु बांधकाम पूर्ण करण्यात येतील असे सांगुन इतर रखडलेले जी कामे आहेत त्याचेदेखील नव्याने इस्टीमेट तयार करण्यात आली असल्याचे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ.नरवाडे** यांनी सदर बांधकाम हे तरतुदी अभावी करण्यात आले नाही किंवा ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे झाले नाही याची विचारणा केली.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सदर कामाची वर्कऑर्डर केंव्हा दिली, निधी कोठून आला, याबाबत सविस्तर टिपणी सादर करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्यावर का.अ. बांध क्र.-२ यांनी ६ कामा पैकी २ कामाकरिता जागा उपलब्ध नाही, व ४ कामे दोन महिन्यात पूर्ण होतील तसेच आरोग्य समितीची मंजुरात लवकरच घेऊन कामे मार्गी लागतील. त्याचप्रमाणे **जि.आ.अ.** यांनी आरोग्य विभागाकडे निधी शिल्लक राहत असल्याचे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी जाणीवपूर्वक लोकांना या सुविधेपासून वंचित ठेवले, लोकांना अडचणी निर्माण केल्या, त्यामुळे या कामी आपणांस सर्वस्वी जबाबदार कां धरण्यात येऊ नये अशी विचारणा करुन मा. उपाध्यक्ष किंवा सन्मा. जि.प. सदस्य यांनी विषय उपस्थित केलेला आहे. तरी तुमच्या काही वेगळ्या अडचणी असल्यास नमुद कराव्या. त्याचप्रमाणे दोन वर्षे निधी असतांना देखील आपण काय केले अशी विचारणा केली.

**सन्मा.सदस्य सौ.उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे पुनवट, ता. वणी येथील नळ योजनेच्या खोदकामाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का.अ. (पा.पु.)** यांचे प्रतिनिधीने संबंधीत कंत्राटदाराचे नांव काळ्या यादीत टाकण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. व उप विभागीय अभियंता यांना सदर काम करण्यास सांगितले असुन त्या ठिकाणी एकुण २३२ नळ कनेक्शन सुरु असल्याचे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी जिल्ह्यात अशाच प्रकारच्या किती विहीरी आहेत याची विचारणा केली असता **का.अ. (पा.पु.)** यांचे प्रतिनिधीने सद्या स्थितीत मौजे सातेफळ या गावाचे प्रकरण असुन या व्यतिरिक्त ईतर कोणत्याही गावाची प्रकरणे नसल्याची सांगीतले. यावर **मा.अध्यक्ष** यांनी मौजे नांझा येथील प्रकरण आहे, ते मार्गी लागले पाहिजे, असे सांगितले. तसेच सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी कार्यकारी अभियंता व संबंधीत सदस्यांना बोलवीण्यात यावे व यावर काय मार्ग काढता येईल याबाबत पहावे. त्याचप्रमाणे जागेचे मालक, सरपंच व सचिव यांना बोलावून त्यांचे समक्ष उक्त विषय निकाली काढण्याचे **निर्देश काअ.(पा.पु.) यांना दिले.**

**मा.सभापती (स.क.स.) श्री. प्रभाकर रा. उईके** यांनी मागील सभेत मौजे बेचखेडा, ता.यवतमाळ या ठिकाणी म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत वृक्ष लागवडीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला होता. यावर **मा.उप.मु.का.(पं.)** यांनी या अनुषंगाने कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे सांगीतले. परंतु संबंधीत सदस्यांनी ग्राम पंचायतीच्या संदर्भामध्ये अडचणी असल्याचे नमुद केले. त्यावर **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा मा. अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी ग्राम पंचायतीची सखोल चौकशी करण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पं.) यांना दिले.**

**सन्मा.सदस्य श्री.अमन ह. गावंडे** यांनी मागील सभेत पिंपरी इजारा ग्रा.पं.पाणी पुरवठ्याचे कामा बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का.अ.(पा.पु.)** यांनी उक्त कामाचे पुनश्चः टेंडर काढण्यासाठी उप अभि. यांना सांगितलेले असुन टेंडर अपलोड झालेले आहे असे सांगीतले.

**मा.सभापती श्री.सुभाष म.ठोकळ (अर्थ व बांध.स.)** यांनी मागील सभेत दारव्हा तालुक्यातील दहेली, हतगाव, पिंपरी, खोपडी येथील शाळांची कामे अर्धवट असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **शिक्षणाधिकारी (प्राथ.)** यांनी हतगांव चे बांधकाम करण्यास दिले असुन मौजे पिंप्रीचे बांधकाम आठ दिवसांत सुरु करणार आहे व खोपडी येथील व्हॅल्युऐशन नुसार २ लाखाचे बांधकाम आहे परंतु ठेकेदारांनी पैश्याची उचल करुन पळ काढल्यामुळे त्याला ८ दिवसाची मुदत देण्यात आली आहे. व पैशाअभावी तेथील कामास सुरवात झाली नसल्याचे सांगीतले. **त्यावर मा. अध्यक्ष** यांनी उक्त प्रकरणात शाखा अभियंत्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली याची विचारणा केली असता **शि.अ. (प्राथ.)** यांनी आपण ७५% निधी देतो व त्यामध्ये स्लॅबपर्यंत काम अपेक्षित राहते असे सांगुन पहिला हप्ता सन २०१३-१४ मध्ये देण्यात आला आणि दुसरा हप्ता माहे फेब्रुवारी-मार्च मध्ये दिला असल्याचे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी त्यांना मुदत द्यावी व सबंधीताविरुध्द जी कांही कठोर कार्यवाही करता येईल ती करावी व त्यांचे कडुन काम करून घेण्याबाबतचे **निर्देश शि.अ.(प्राथ.) यांना दिले.**

**सन्मा.सदस्य श्री.अमन ह. गावंडे** यांनी मागील सभेत बाभुळगांव करिता म.जी.प्रा.ची नविन नळ योजनेस विलंब लागणार असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर का.अ.(पा.पु.)** यांनी स्लॅब काढलेला आहे परंतु पाणी पुरवठा करता येतो असे सांगुन तेथील काम सुरू करण्यात आले आहे असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी या योजनेसंदर्भात वेगवेगळी उत्तरे देण्यात आली असे सांगुन जल व्यवस्थापन समितीमध्ये मजुरा अभावी ते काम होऊ शकले नाही असे सांगण्यात आले व तशी नोंद जलव्यवस्थापन समितीच्या कार्यवृत्तामध्ये आहे. त्याचप्रमणे बाभुळगांवच्या संदर्भामध्ये जलव्यवस्थापन समितीच्या वेळी म.जि.प्रा.च्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर व आजच्या सभेस उपस्थित असलेल्या म.जि.प्रा.च्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर वेगवेगळे असल्यामुळे सभागृहाची दिशाभूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत असल्याने व आमच्या डिव्हिजनला कर्मचारी नसल्यामुळे आम्ही येऊ शकलो नाही, असे उत्तर एम.जे.पी. चे प्रतिनिधींनी दिलेत. त्यामुळे सभागृहाने तिव्र नाराजी व्यक्त केली व आपण आपल्या स्तरावरून वरिष्ठांवर कार्यवाही करावी असे म.जि.प्र.च्या प्रतिनिधींना सांगीतले. त्याचप्रमाणे सदर निर्देश स्थायी समितीमध्ये दिल्याबाबतची नोंद कार्यवृत्तात घेण्याबाबतचे **निर्देश सचिवास दिले.**

**मा.सभापती (अर्थ व बांध.स.) श्री. सुभाष म.ठोकळ** यांनी मागील सभेत मौजे आष्टा सावरगांव, बोरी महाल, रासा, उमरसरा गां.प.तक्रार व इतर तक्रारी बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का.अ. बांध क्र.१** यांनी आष्टा १ आठवडा, बोरीमहल खडीकरण दोन दिवसात होवून जाईल. अशाप्रकारे ७ जून पूर्वी ही कामे पूर्ण होईल, असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री दिवाकर ध. राठोड** यांनी मौजे फूलवाडी, मोख, सावंगा येथे विंधन विहिरी मधून उपाय योजना करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ.(पा.पु.) यांनी संबंधीत ग.वि.अ. यांच्याकडून तसा प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे सांगुन प्रस्ताव पाठविण्याबाबत सुचित करण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी पाणी टंचाई कृती आराखडा संबंधीत सदस्यांना देण्याबाबत ग.वि.अ.यांना कळविण्यात यावे असे सुचित केले असता **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी कृती आराखडा सबंधित सन्मा सदस्यांना देण्याबाबत ग.वि.अ. यांना कळविण्याचे **निर्देश का.अ.(पा.पु.) यांना दिले.**

**ठराव क्र. १:-** **दिनांक २१.०४.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास ही सभा मंजुरी प्रदान करते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र. २ :-** **शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

१.उप मु.का.अ.(सां.) यांनी राज्य ग्रामीण विकास संस्था पुणे यांचे कडील राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियाना अंतर्गत जिल्हा परिषद कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम बाबत संचालक, यांचे पत्र क्र.एसआयआरडी/२०१३-१४/रागापसअ/०४/दि.१३ फेब्रुवारी २०१४ चे वाचन केले.

२. उप मु.का.अ.(पंचा.) यांनी उप सचिव (रोहयो) यांचे कडील राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या जवाहर /धडक सिंचन विहीर योजनेतील प्रगतीपथावरील पात्र लाभार्थ्यांच्या विहीरी म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत वर्ग करणेसाठी मार्गदर्शक सुचना नियोजन विभाग शा.प.क्र.योजना-२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५/दि.१६ एप्रिल २०१४ चे वाचन केले.

**विषय क्र.३ :-** **सामान्य प्रशासन विभाग व पंचायत समितीकडील वाहनावर होणा-या वार्षिक विहित मर्यादेपर्यतच्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(सां.) यांनी सभेत दिली. ग्रा.वि.व जलसंधारण विभाग शा.नि. क्र. जेईपी /१०/२००२/पंरा-१ दिनांक ११ जानेवारी २०१० चे शासन निर्णयान्वये पेट्रोल वाहनावर रुपये ४०,०००/- व डिझेल वाहनावर रुपये ५०,०००/- ची दुरुस्ती तथा सुटे भाग खरेदी यावर वार्षिक खर्चाची मर्यादा आहे. त्याचप्रमाणे शा. नि. क्रमांक झेडपी/१०९९/प्र.क्र.१३५ दिनांक ३१/०८/१९९९ मधील सुचनांचे पालन करण्यात येईल. सा. प्र. वि. जि.प.यवतमाळ अधिनस्त पेट्रोलवर चालणारी ११ व डिझेलवर चालणारी २ वाहने अशी एकुण १३ वाहने. पंचायत समीती कडील डिझेलवर चालणारी १६ वाहने असे एकुण २९ वाहनांची देखभाल दुरुस्ती खर्चाची वार्षिक मर्यादा पेट्रोल करिता रुपये ४०,०००/- व डिझेलव वाहनावर रुपये ५०,०००/- एवढी आहे. सदर मर्यादेपर्यंत देखभाल व दुरुस्ती बाबतच्या प्रस्तावाची संख्या व मंजुर करावयास लागणारे टायर, टयुब्स, बॅटरी व सुटे भाग खरेदी दुरुस्ती व जॉबवर्क या बाबी अंतर्भुत करण्यात आलेल्या आहेत. करिता या संपुर्ण २९ वाहनावर सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात होणा-या देखभाल व दुरुस्तीच्या एकत्रित खर्चास स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर विषय स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे. कृपया विषयास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती.

**वाहनाचा तपशिल**

| अ.क्र. | वाहन अधिनस्त असलेले पदाधिकारी / अधिकारी | इंधनाचा प्रकार | वार्षिक विहीत मर्यादा | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मा. अध्यक्ष,जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५९९ |
| २ | मा. उपाध्यक्ष, जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५११ |
| ३ | मा.सभापती (शि.व.आ.) जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५१२ |
| ४ | मा.सभापती (बांध. व अर्थ.) जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५१३ |
| ५ | मा.सभापती (स.क.स.) जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५१४ |
| ६ | मा.सभापती (म.व.बाक.) जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९९०९ |
| ७ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९५१५ |
| ८ | मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि. प. यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९३९३ |
| ९ | मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)जि.प. यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ एम ९२१६ |
| १० | मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.)जि.प. यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ जी ६८३ |
| ११ | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. यवतमाळ | पेट्रोल | ४०,०००/- | एम.एच.२९ जी ५२५ |
| १२ | वरिष्ठ लेखा अधिकारी जि.प. यवतमाळ | डिझेल | ५०,०००/- | एम.एच.२९ एफ १२७ |
| १३ | कृषि विकास अधिकारी जि.प. यवतमाळ | डिझेल | ५०,०००/- | एम.एच.२९ सी १३६६ |
| १४ | गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व | डिझेल | ५०,०००/- | एकुण १६ वाहने |

सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. २:-** **ग्रा.वि.व जलसंधारण विभाग शा.नि. क्र. जेईपी /१०/२००२/पंरा-१ दिनांक ११ जानेवारी २०१० च्या शासन निर्णयान्वये . सा. प्र. वि. जि.प.यवतमाळ अधिनस्त पेट्रोलवर चालणारी ११ व डिझेलवर चालणारी २ वाहने अशी एकुण १३ वाहने तसेच पंचायत समीती कडील डिझेलवर चालणारी १६ वाहने असे एकुण २९ वाहनांची देखभाल दुरुस्ती खर्चाची वार्षिक मर्यादा पेट्रोल करिता रुपये ४०,०००/- व डिझेल वाहनावर रुपये ५०,०००/- मर्यादेपर्यंत देखभाल व दुरुस्तीस लागणारे टायर, टयुब्स, बॅटरी व सुटे भाग खरेदी दुरुस्ती व जॉबवर्क या वरील संपुर्ण २९ वाहनावर सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात होणा-या देखभाल व दुरुस्तीच्या प्रस्तावास ही सभा मंजुरी प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र. ४ -** **जिल्हा ग्राम विकास निधी माहे-जानेवारी ते मार्च- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास मंजुरात देणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(पं.) यांनी सभेत दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये स्थायी समितीची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे जानेवारी-२०१४ ते मार्च- २०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजूरीकरीता खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे. कृपया प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. तसेच मा.उप मु.का.अ.(पंचा.) यांनी मौजे कार्ली, वाकी रोड, मडकोना, धानोरा शाळांचे बांधकामासाठी कर्ज घेतले असल्याचे सांगीतले. सदर विषयावर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी कर्ज केंव्हा उचलले, कर्ज थकीत आहे काय, व किती कर्ज वसूल होणे अपेक्षित होते, याबाबत लेखी देण्याची मागणी केली तसेच उत्पन्न वाढविण्यासाठी काहीच योजना नाहीत काय अशी विचारणा करुन नऊ कोटी रूपये शिल्लक असतांना केवळ व्याज घेणार असाल तर त्याचा काहीही उपयोग नाही. त्यापेक्षा उत्पन्न वाढविण्याठी शासनस्तरावर चर्चा करण्यात यावी असे सांगीतले. त्यावर **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी ज्यांच्याकडे थकीत रक्कमा आहेत अश्या लोकांना बोलवावे असे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा.)** यांना दिले व खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.३ :-** **मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये जि.ग्रा.वि.निधी माहे -जानेवारी ते मार्च-२०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिण्यातील सुरवातीची शिल्लक | **९,८९,१०,४०८.४१** |
| २ | महिण्यातील जमा | **०७,६७,९११.००** |
| ३ | एकुण जमा रक्कम रुपये | **९,९६,७८,३१९.४१** |
| ४ | महिण्यात झालेला खर्च रक्कम रुपये | **५७.००** |
| ५ | महिना अखेर शिल्लक रक्कम रुपये | **९,९६,७८,२६२.४१** |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय</u>**

**विषय क्र.५ :-** **सामान्य प्रशासन विभागामधील सेवा विषयक नोंदवहयातील नोंदी पूर्णत्वाचे माहे एप्रील-२०१४ च्या त्रैमासिक अहवालास मान्यता प्रदान करण्याबाबत.**

विषयाची माहीती उप मु.का.अ.(सा.) यांनी सभेत दिली. सामान्य प्रशासन, विभागातील लेखा विषयक नोंदवहयातील नोंदी पूर्ण असल्याबाबतचा माहे जानेवारी २०१४ ते मार्च- २०१४ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल मा. आयुक्त ,अमरावती विभाग, अमरावती यांना सादर करावयाचा आहे. तथापि सदर नोंदवहयाचे अहवालास स्थायी समितीची मंजूरीची आवश्यकता आहे.

कृपया नोंदवहयातील नोंदी पूर्ण असल्याबाबतच्या अहवालास मंजूरात प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.अध्यक्ष** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत माडला.

**ठराव क्र ३:-** **सामान्य प्रशासन विभागातील लेखा विषयक नोंदवहया माहे जानेवारी २०१४ ते मार्च-२०१४ या कालावधीतील पुर्ण असल्याचा त्रैमासिक अहवाल मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना पाठविण्यास ही सभा मंजुरी प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.</u>**

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी शासनाचे जानेवारी महिन्यामध्ये परिपत्रक आले होते. त्यामध्ये ज्या विहिरी कांही कारणाने रखडलेल्या आहेत, अश्या विहिरी त्या वेळेस १ लाखाच्या मर्यादेपर्यंत होत्या, त्या अपूर्ण असल्यास एम.आर.ई.जी.एस. मध्ये २ लाख ५० हजार मंजूरी देऊन घेऊ शकतो असे सांगुन ग्राम पंचायत हद्दीत असलेल्या विहिरी किती, या संदर्भात १ मे रोजी झालेल्या ग्राम सभेत माहिती दिला होती काय अशी विचारणा करुन याची तारीख संपली असल्याचे सांगतले. **त्यावर मा. उप मु.का.अ.(पंचा.)** यांनी यावर आपण व्यापक प्रमाणात कार्यक्रम घेतले असुन सर्व ग.वि.अ.यांना सुचना दिल्या असल्याचे सांगीतले. तसेच **मा.अति.मु.का.अ.** यांनी धडक योजनेमध्ये ३२०० विहीरी असल्याचे सांगीतले. यावर **सन्मा.सदस्य** यांनी धडक योजनेमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी रखडल्या असल्याने जेवढे काम झालेले आहे, त्या स्थितीमध्ये त्यांचे मुल्यांकन करून नरेगामध्ये रुपांतरी करावयाच्या आहे. त्याचप्रमाणे धडक योजनेमधील मंजुर झालेल्या विहिरी पैकी किती अपूर्ण, किती पूर्ण व पुर्ण असलेल्या विहिरीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याची विचारणा केली.

**मा.अति.मु.का.अ.** यांनी एकुण प्र.मा. दिलेल्या १४८४५ विहीरी पैकी पूर्ण झालेल्या विहिरी ७१५२, अपूर्ण विहिरी ३२००, नरेगा धडक योजने अंतर्गत १२०० ते १३००. व नरेगाकरीता जे लोकं बसत नाहीत अश्या ११५० विहिरी रद्द असल्याचे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी धडक योजनेमधील ज्या विहिरी अपूर्ण आहे, त्या विहिरी वर्ग करावयाच्या आहेत. तसेच १३०० विहिरी संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांचेकडे बैठक झाली असुन त्यावेळी काम बघून पंचनामा करून फायनल करावयाच्या आहे आणि उर्वरीत कामाचे इस्टीमेट ग.वि.अ. व जिल्हा परिषदेचे पदाधिकारी यांना सर्वांना बोलावून त्यांचेसी चर्चा करून २० तारखेस होणाऱ्या कार्यशाळेमध्ये विहिरीबाबतचा मुद्दा घेण्यात यावा असे सांगीतले. यावर **मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी आजच्या सभेचा संदर्भ घेऊन ज्यांच्याकडे या संबंधाने माहिती आहे अश्यांना ग्रामसभा घेण्याबाबत कळविण्याचे **निर्देष उप मु.का.अ.(पंचा.) यांना दिले.**

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी जिल्हा परिषदेच्या शाळा करीता काही ठिकाणी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे तरी सध्या त्या बाबत काय स्थिती आहे या बाबत का.अ.बांध-१ यांना विचारणा केली असता बांधकामांचे टेंडर अपलोड झालेले असुन ३५ लाखाचे बांधकामाबाबतची नस्ती मु.ले.वि.अ.यांचे कार्यालयास सादर करण्यात

आली आहे. यावर **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी सदरचे काम एक महिण्यामध्ये पूर्ण करून घेण्याबाबतचे निर्देश का.अ.बांध-१ यांना दिले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी १०० च्या वर शिक्षकेत्तर पदे रिक्त आहेत, तर विद्यार्थ्यांना काय शिक्षण देणार आहात व जिल्हा परिषद हायस्कूल चे १३५ पदे रिक्त असल्याबाबत शि.अ.(प्राथ.) यांना विचारणा केली.

**सन्मा.सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी दिग्रस तालुक्यातील मौजे चिरकुटा-दाभा या रस्त्यावर प्रंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत सुरु असलेल्या कामाची माहिती सन्मा.सदस्याला दिली नसल्याचे सांगुन उक्त कामाची क्वालीटी कंट्रोल मार्फत तपासणी करण्यात यावी, असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी प्रंतप्रधान ग्राम सडक योजने मधून मंजूर झालेल्या रस्त्यांची नांवे सुचविण्याबाबत सांगितले असता, उप.का.प्रं.ग्रा.स.यो. यांनी मंजुर कामाची यादी वाचुन दाखविली तसेच टप्पा क्र. ३ मधील प्रस्तावित कामाची यादी देखील सभेमध्ये वाचून दाखविण्यात आली.

**सन्मा.सदस्य श्री.अनिल भ. नरवाडे** यांनी मौजे आंबोडा ते चिलगव्हाण रस्त्याचे काम अजून सुरू झालेले नाही, याबाबत विचारणा केली असता **का.अभि.बांध.२** यांनी सदर कामाचे रिटेंडर करावे लागणार असल्याचे सांगुन फक्त दोनच निविदा आल्या होत्या असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मा.सभापती यांना फ्लड च्या कार्यक्रमामध्ये आपण काय नियोजन करणार आहात व त्यामध्ये आपल्याला किती रूपये आले, याबाबत विचारणा केली असता **का.अ.बांध.१** यांनी ८२ कोटीचा कार्यक्रम शासनाकडे पाठविण्यात आला असुन त्यापोटी रु.सव्वा अकरा कोटी प्राप्त झाल असल्याचे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी आमच्याकडून जी कामे घेणार आहात व समितीमध्ये ठेवणार आहात, तीच कामे आमदारांकडून आलीत तर काय करणार आहात, असे विचारणा केली असता, का.अ.बांध-१ यांनी बहूमताने निर्णय घेऊ, असे उत्तर दिले **त्यावर सन्मा सदस्य** यांनी आमचेकडून घेतलेली कामे मान्य होतील असे नाही त्यामुळे आम्ही लोकांना विश्वासावर ठेवू नये असे मत व्यक्त केले. **त्यावर मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी जी कामे सदस्यांच्या शिफारसीनुसार आहेत, त्यामध्ये ३० लाख होत असेल तर रुपये २५ लाख करू,परंतु कामाची संख्या कमी न करता रक्कम कमी करण्यात यावी असे **निर्देश का.अ.बांध-१ यांना दिले.**

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी महागांव पं.स. ला एकही कनिष्ठ अभियंता नसल्याचे सांगुन जो कनिष्ठ अभियंता आहे त्याची देखील बदली झालेली आहे, परंतु त्याला एक वर्षापासुन कार्यमुक्त करण्यात आलेले नाही असे सांगीतले. त्यावर **मा.अति.मु.का.अ.** यांनी बदलीच्या कालावधी मध्ये कनिष्ठ अभियंताची यांची नियुक्ती करण्यात येणार आहे असे सांगीतले.

**मा.सभापती (स्थायी समिती ) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी मौजे चहांद-परसोडी ता. कळंब येथील आरोग्य उपकेंद्राचे बांधकामाबाबत काय स्थिती आहे याची विचारणा केली असता का.अ.बांध-१ यांनी उक्त विषयाची नस्ती वित्त विभागाकडे सादर करण्यात आली असुन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल असे सांगीतले.

**मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष,** यांनी उमरी शहीद येथील कामाबाबत विचारणा केली असता, का.अ.बांध-१ यांनी बांधकामाचे रु. २५ लाखाचे टेंडर लावलेले आहे व ९ ऑगष्ट पूर्वी काम पूर्ण होईल, असे सांगितले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी साथीच्या आजाराबाबत दैनिक लोकमत च्या अंकामध्ये ठ ळक स्वरुपात बातमी प्रसिध्द झालेली असल्याचे सांगुन याबाबत आपण सर्वसाधारण सुचना ग्राम पंचायतीला पाठवावयास पाहिजे, तसेच जनसामान्य नागरीक याचे गांभीर्य लक्षात घेत नाही. त्याचप्रमाणे दोन दिवसापुर्वी मौजे तिवसा येथे डायरियाची लागण झाली होती त्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली याची विचारणा केली असता **जि.आ.अ.** यांनी सदर ठिकाणी खाजगी विहिर होती व त्या ठिकाणी क्लोरिकेशन होत नव्हते त्यामुळे दिनांक १० ते ११ तारखेपासून डायरियाची लागण झाली असल्याचे सांगुन आमच्या कर्मचाऱ्यांनी एकही पेशन्ट रेफर केलेला नाही परंतु ग्राम पंचायतीला ब्लिचिंग नसेल तर त्यांनी आम्हाला कळवावयास पाहिजे होते असे सांगुन सरकारी रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णामध्ये सुधारणा झाली असल्याचे सांगीतले व यामध्ये सबंधित ग्रामसेवक सुध्दा भरती आहे. सदर ग्रा.प.करिता ५० किलो ब्लिचिंगचा पुरवठा करण्यात आला असल्याचे सांगुन नियमीतपणे ब्लिचिंग होणे आवश्यक आहे. तसेच निर्जंतुकीकरण करण्यामध्ये डेली क्लोरिफिकेशन

करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष,** यांनी यापुढे अश्या प्रकारच्या घटना घडु नये याची दक्षता घेऊन सदहुं ग्रा.प मध्ये ब्लिचिंग पावडर यापूर्वी घ्यावयास पाहिजे होते असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी ग्राम पंचायतचे ठिकाणी आरोग्य विभागाचे कर्मचारी यांचेमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे असे सांगुन ज्या ठिकाणी अश्या कर्मचा-यांचे समन्वय नाही अश्या कर्मचा-यांना तात्काळ सेवेतून मुक्त केले पाहिजे व संबंधीत कर्मचाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी पशुसंवर्धन विभागामार्फत बोकड वाटपाबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची विचारणा केली.

**मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष,** यांनी पुढील आचार संहितेबाबत एक एक दिवस हा महत्वाचा असल्याबाबत समजून घ्यावे तसेच पदविधर शिक्षक निवडणुक -२०१४ व विधान सभा बाबतची आचारसंहिता लवकरच लागणार असल्याचे सांगुन ज्या ज्या खाते प्रमखाकडील प्रस्ताव मंजूर करावयाचे असेल त्यांनी लवकरात लवकर विषयाची टिपणीसह प्रस्ताव सादर करुन प्रशासकीय मान्यता घ्यावी असे सांगीतले.

**मा.सभापती श्री.प्रभाकर राघोजी उईके(स.क.स.)** यांनी १३ व्या वित्त आयोगाचे काय झाले याबाबत विचारणा केली.

विषय पत्रीकेवरील विषय व चर्चा संपल्यानंतर सभागृहाने कामकाजात भाग घेऊन सहकार्य केल्याबध्दल उपस्थितांचे आभार मानुन **मा. सभापती स्थायी समिती तथा अध्यक्ष, जि. प. यवतमाळ** यांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे सचिवांनी जाहीर केले.

**सचिव,**
**स्थायी समिती,**
**जि.प.यवतमाळ**

**सभापती,**
**स्थायी समिती**
**जि.प.यवतमाळ**